महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी १०९०/२५४६/विशि-२
शिक्षण व सेवा योजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ जुलै, १९९०.

प्रति,

कुलसचिव,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय:- सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत

महोदय,

सन १९९०-९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन बॅकवर्ड क्लास यूथ रिलिफ कमिटी, नागपूर. या संस्थेच्या १९९०-९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन महाविद्यालये उघडण्याकरीता आलेल्या अर्जावर नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ८३[४]व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|
| भिवापूर | कला व वाणिज्य |

२. शासनाने संलग्नीकरणाकरीता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे:-

१. सदर महाविद्यालयास सध्या विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. एनजीसी २०८८/[१६५२]/विशि-२ अ, दिनांक ४.१.१९८९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सूत्रानुसार या महाविद्यालयाला अनुदानसंहित तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२. ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, तरच वर्ग १९९०-९१ पासून सुरू करावा तसेच १९९०-९१ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेस कमीत कमी ५० विद्यार्थी बसले पाहिजेत.

३. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३(६)व (७) यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४. संबंधित संस्थेस महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी देताना त्या संस्थेस विद्यापीठाने असे नि:संदिग्धपणे कळवावे की, प्रवेश सध्या तात्पुरत्या स्वरूपात देऊन जर ६० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरू करावेत. महाविद्यालयात पुढे देण्यात येणारे संलग्नीकरणही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील. अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३(६) व (७) अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठविताना ही अट पूर्ण झाली किंवा नाही यावद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रशासनाधिकारी (उच्च शिक्षण अनुदान),
सचिव, बॅकवर्ड क्लास यूथ रिलिफ कमिटी नागपूर.
निवड नस्ती.

एसआर